# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कार्यालय इमारत

(दुसरा व चौथा मजला) सर्व्हे नं. 832 ए, शिवाजीनगर पुणे- 411004

दूरध्वनी क्र.: 020-29709396 वेबसाईट : www.mscepune.in ई-मेल : mscepune@gmail.com


जा.क्र.मरापप /स्वी.स/ 210/2026 दि.18/05/2026

## प्रसिद्धीपत्रक

**विषय :- एप्रिल, 2026 च्या रिपीटर परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना जुलै, 2026 मध्ये होणाऱ्या संगणक लघुलेखन परीक्षेसाठी संधी देणेबाबत...**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे मार्फत एप्रिल 2026 मध्ये घेण्यात आलेल्या शासकीय संगणक टंकलेखन रिपीटर(Repeater Exam) परीक्षेचा दि.15/5/2026 रोजी निकाल जाहीर करण्यात आलेला असून, या परीक्षेमध्ये ज्या उमेदवारांनी लघुलेखन परीक्षेसाठी आवश्यक असलेल्या पूर्व अटीची पूर्तता केलेली आहे,अशा उमेदवारांना जून,2026 मध्ये होणाऱ्या नियमित सत्राच्या संगणक लघुलेखन परीक्षेसाठी संधी देणे आवश्यक आहे.

सबब, एप्रिल 2026 च्या रिपीटर परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांपैकी जून,2026 मध्ये होणाऱ्या संगणक लघुलेखन परीक्षेस प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांकडून त्यांच्या लघुलेखन संस्थेमार्फत मराठी, हिंदी व इंग्रजी - 60,80,100,120 शब्द प्रति मिनिट या विषयांचे आवेदनपत्रे ऑनलाइन पद्धतीने मागविण्यात येत आहेत.

जून,2026च्या संगणक लघुलेखन परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कासह आवेदन पत्र भरण्याकरिता दि.18/05/2026 (दुपारी 12.00 वाजेपासून) ते 21/05/2026 (रात्री 23.59 वाजेपर्यंत) या कालावधीत ऑनलाइन स्वरूपात लिंक उपलब्ध करून देण्यात येत आहे. सर्व विद्यार्थ्यांनी व संस्थाचालकांनी नोंद घ्यावी.

18/5/26

दिनांक : 18/05/20256

स्थळ : पुणे

**डॉ.नंदकुमार बेडसे (भा.प्र.से),**
**अध्यक्ष,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे.**

Scanned with OKEN Scanner